**प्रेसनोट** **दि.२१/०३/२०१९**

## मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## सराईत गुन्हेगारास गावठी कटटा व जिवंत काडतुसासह केले जेरबंद

दि.१८/०३/२०१९ रोजी मुंढवा पोलीस स्टेशन कडील पोलीस उप निरीक्षक गवळी, सहा. पोलीस फौजदार सोनवणे, पो.हवा. चव्हाण, पो.शि. कांबळे व पो.शि गणेश भापकर यांना बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने मुंढवा पोलीस ठाणे गु.र.नं.१६२/२०११ व गु.र.नं. १४३/२०१४ मधील पाहिजे आरोपी नामे १) आप्पा भोसले, रा. फुरसुंगी, पुणे २) संतोष रामचंद्र वाघमारे, रा. खडकी, पुणे हे राहात असलेल्या ठिकाणाबाबत माहिती मिळाल्याने वर नमूद अधिकारी व कर्मचारी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संपत डी. भोसले यांना सदर आरोपीबाबत माहिती दिली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक व कर्मचारी यांना योग्य ते मार्गदर्शन करुन रवाना केले असता नमुद पोलीस उप-निरीक्षक गवळी व कर्मचारी यांनी नमुद बातमीचे अनुषंगाने सदर ठिकाणी आरोपीतांचा शोध घेवून शिताफीने सदर आरोपी १) आप्पा भोसले, रा. फुरसुंगी, पुणे २) संतोष रामचंद्र वाघमारे, रा. खडकी, पुणे यांना अटक करण्यात आले.

सदर कारवाई मा.श्री. ए.बी. फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे, मा.श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५, पुणे, मा.श्री. सुनिल देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, पुणे शहर, संपत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक अमोल गवळी, सहा पोलीस फौजदार सोनवणे, पोलीस हवालदार चव्हाण पो.शि. कांबळे, पो.शि भापकर यांनी उपरोक्त कामगिरी केली आहे.

**(संपत डी. भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**